# २.ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना

आदिवासी विकास विभागाची स्वयंम योजना व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वाधार योजनेच्या धर्तीवर इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून भटक्या जमाती–क प्रवर्गातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांकरीता निर्वाह भत्याची पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना कार्यान्वित असल्यामुळे सदर योजनेचा लाभ घेत असलेले /घेणारे भटक्या जमाती–क प्रवर्गातील धनगर समाजाचे विद्याथी वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रति जिल्हा ६०० या प्रमाणे एकूण २१,६०० विद्यार्थ्यांकरिता “ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना” राबविण्यास दि.१३.१२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर योजनेंतर्गत भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी खालीलप्रमाणे निश्चित केल्यानुसार विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांक संलग्न असलेल्या बँक खात्यात थेट रक्कम वितरीत करण्यात येईल.

| अ.क्र | खर्चाची बाब | मुंबई शहर, मुंबई, उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी–चिंचवड, नागपूर या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर महसुली विभागीय शहरातील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर जिल्याचे ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | भोजन भत्ता | ३२,००० | २८,००० | २५,००० | २३,००० |
| २ | निवास भत्ता | २०,००० | १५,००० | १२,००० | १०,००० |
| ३ | निर्वाह भत्ता | ८,००० | ८,००० | ६,००० | ५,००० |
| प्रति विध्यार्थी एकूण संभाव्य वार्षिक खर्च | | ६०,००० | ५१,००० | ४३,००० | ३८,००० |

**अर्ज प्रक्रिया :–**

सदर योजनेकरिता वेळापत्रक जाहीर केल्यानंतर विद्यार्थी संबंधित जिल्हयातील सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांचेकडे ऑनलाईन / ऑफलाईन अर्ज सादर करतील. सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण हे अर्जाची छाननी करतील आणि पात्र लाभार्थ्यांची यादी जाहीर करतील.

सदर योजनेकरीता सर्वसाधारण अटी व शर्ती पुढील प्रमाणे असतील :–

१. विद्यार्थी वसतीगृह प्रवेशास पात्र असावा.

२. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
३. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाचा जातीचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल.
४. अनाथ प्रवर्गामधून अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना महिला व बालकल्याण विभागाकडील सक्षम प्राधिका-याचे अनाथ प्रमाणपत्र आनिवार्य आहे.
५. दिव्यांग प्रवर्गामधून अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना जिल्हा शल्य चिकित्सक यांचे ४०% पेक्षा जास्त दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे.
६. विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख पेक्षा जास्त नसावे. तसेच केंद्र शासनामार्फत ज्या ज्या वेळी मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ होईल, त्यानुसार या योजनेसाठी पालकाची वार्षिक उत्पन्न मर्यादा लागू राहील.
७. विद्यार्थ्यांने स्वतःचा आधार क्रमांक आपले राष्ट्रीयकृत बँक खात्याशी संलग्न करणे बंधनकारक राहील.
८. विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या शहराच्या/तालुक्याच्या ठिकाणी आहे अशा शहरातील सदर विद्यार्थी रहिवाशी नसावा.

**शैक्षणिक निकष :-**

१. सदरचा विद्यार्थी १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा.
२. व्यवसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांस सदर योजनेसाठी अर्ज करताना किमान ६० टक्के किंवा त्या प्रमाणात ग्रेडेशन/ CGPA चे गुण असणे आवश्यक राहील.
३. व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार त्या संबंधित प्रवर्गातून प्रवेश देण्यात येतील. यासाठी इयत्ता १२ वी च्या गुणांची टक्केवारी विचारात घेतली जाईल.
४. योजनेतंर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ४% समांतर आरक्षण किंवा शासन वेळोवेळी निर्धारित करेल त्याप्रमाणे असेल. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तेची किमान टक्केवारीची मर्यादा ५०% इतकी राहील, व यासाठी त्यांची स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.
५. सदर योजनेतंर्गत महिलांसाठी ३०% समांतर आरक्षण किंवा शासन वेळोवेळी निर्धारित करेल त्याप्रमाणे आरक्षण अनुज्ञेय असेल.

**योजनेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे :-**

- भाड्याने राहत असल्याबाबत व स्थानिक रहिवासी नसल्याचे प्रतिज्ञापत्र (नोटरी)
- स्वयंघोषणापत्र (दिलेली माहिती खरी व अचुक असल्याबाबत)
- कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेश घेतला नसल्याबाबतचे शपथपत्र
- भाड्याने राहत असल्याबाबतचे भाडे चिठ्ठी व भाडे करारपत्र / करारनामा
- महाविद्यालयात प्रवेश घेतल्याचा पुरावा

- **सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी संपर्क :- संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग**
- **शासन निर्णय :- क्रमांक वगृयो-२०२२/प्र.क्र.११/योजना-५ दि. १३ डिसेंबर, २०२३,**